MHBH070010312025

दाखल दिनांक :- ०७/१०/२०२५
नोंदणी दिनांक :- ०७/१०/२०२५
निकाल दिनांक :- २३/०७/२०२६
कालावधी **:-** ०० व**,** ०९ म**,** १६ दि**.**

**भाग- अ**

## <u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२), पवनी, जि. भंडारा यांचे न्यायालय.</u>

## (पिठासिन अधिकारी व्ही.आर.फरकुंडे)

| | |
|---|---|
| **सं.फौ.प्र.क्र.५००/२०२५** | **निशाणी क्र.०७ खाली.** |
| **अपराध क्रमांक–१३५/२०२५,** | **दिनांक २४/०५/२०२५** |
| **पोलिस ठाणे – अडयाळ, तालुका–पवनी, जिल्हा –भंडारा.** | |
| **फिर्यादी/तक्रारकर्ता** | **महाराष्ट्र शासन.**<br>तर्फे – पोलीस ठाणे, अडयाळ,<br>ता. पवनी, जि. भंडारा.<br>**मुळ फिर्यादी–रविंद्र सुर्यभानजी आंबुडारे,**<br>वय – ४२ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>रा. पो.स्टे. अडयाळ, तालुका – पवनी, जिल्हा– भंडारा. |
| **सरकार पक्षातर्फे वकील.** | **एन. के. गजभिये (सहाय्यक सरकारी वकील).** |
| **आरोपी.** | **भिमराव गणपत उके,**<br>वय – ६५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. बोरगाव (खुर्द), तालुका व जिल्हा– भंडारा. |
| **आरोपीतर्फे वकील.** | **व्ही.आर.मेश्राम.** |

**भाग - ब**

## <u>गुन्हयाचा तपशील</u>

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | २४/०५/२०२५ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | २४/०५/२०२५ |

| | | |
|---|---|---|
| ३. | दोषारोपपत्र दाखल तारीख | ०७/१०/२०२५ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | १९/०१/२०२६ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | ०५/०३/२०२६ |
| ६. | निकालासाठी राखीव ठेवल्याची तारीख | २३/०७/२०२६ |
| ७. | निकाल तारीख | २३/०७/२०२६ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | निरंक. |

**आरोपीचा तपशील**

| **अ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **आरोपी अटक तारिख** | **आरोपीस जामीन दिल्याची तारिख** | **गुन्हा** | **आरोपीस शिक्षा दिली / निर्दोष मुक्तता** | **शिक्षा** | **आरोपी बंदी असलेला कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भिमराव गणपत उके | दि.२४/०५/२५ रोजी पोलीसांनी आरोपीस सुचनापत्रावर सोडले. | दिनांक ०४/११/२५ | म.दा.का. कलम ६५ (ई) | निर्दोष मुक्त केले. | नाही. | निरंक |

**न्या य नि र्ण य**

**(आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी)**

**१.** आरोपी भिमराव गणपत उके याच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) अंतर्गतची प्रस्तुत संपरीक्षा आहे.

**२.** सरकार पक्षाची थोडक्यात अशी हकीकत आहे की, दिनांक २४/०५/२०२५ रोजी फिर्यादीने पंचासह मौजा बोरगाव (खुर्द), ता. व जि. भंडारा येथे आरोपीच्या घरी प्रोहिबीशनकामी रेड घातली असता आरोपी त्याच्या घराच्या समोरील एका

लहान घराचे खोलीत एका विना झाकणाच्या पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक डबकीत अंदाजे ०४ लिटर हा.भ. दारू एकूण किंमत ८००/- रुपयांचा मुद्देमाल अवैधरित्या विना परवाना बाळगताना मिळून आला. सबब फिर्यादीने आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा नोंद केला.

३. या गुन्हयाचा तपास पो.हवा. मंगेश बाभरे यांनी केला. त्यांच्या तपासात त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि आरोपीविरुध्द पुरावा आल्याने अंतिम अहवाल सादर केले. तसेच प्रस्तुत प्रकरणात पो. हवा. रविंद्र आंबुडारे यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केले.

४. न्यायालयाने आरोपीविरुध्द **निशाणी क्रमांक ०७** अन्वये दोषारोप ठेवले होते. त्यामधील मजकुर त्याला वाचून व समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे स्पष्ट करुन सदर खटला चालविण्याची तयारी दर्शविली होती. सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द खटला सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार, फिर्यादी आणि तपासी अधिकारी यांना तपासण्यात आले. दिनांक ०२/०६/२०२६ रोजीच्या **निशाणी क्रमांक ०१** वरील आदेशानुसार सरकारपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे जबाब **निशाणी क्रमांक ०७ खाली** नोंदविण्यात आला. त्याचा जबाब पूर्णपणे नकारात्मक असून सदर खटल्यात त्याला नाहक गोवण्यात आले आहे असे त्याचे म्हणणे आहे.

५. विद्वान सहाय्यक सरकारी वकील एन. के. गजभिये आणि आरोपीतर्फे विद्वान वकील व्ही. आर. मेश्राम यांचा युक्तीवाद ऐकला.

६. सबब एकूण हकीकत व युक्तीवाद पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष पुढील कारणाप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष सिध्द करतात काय की, दिनांक २४/०५/२०२५ रोजी १९:१५ ते १९:५० वाजताच्या सुमारास मौजा बोरगाव, ता. व जि. भंडारा येथे आरोपी त्याच्या ताब्यात अंदाजे ०४ लिटर मोहफुलाची हातभट्टी दारु एकूण किंमत ८००/- रुपयांचा मुद्देमाल अवैधरित्या विना परवाना बाळगताना मिळून आला ? | **नाही.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम निकालाप्रमाणे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता –</u>**

**७.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा आरोप सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार सोमलाल मंडीये**(सा.क्र.१)**, फिर्यादी रविंद्र आंबुडारे**(सा.क्र.२)** आणि तपासी अधिकारी मंगेश बाभरे **(सा.क्र.३)** यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे.

८. सरकारपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेले पंच साक्षीदार सोमलाल मंडीये (सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांना पंचनाम्याच्या कार्यवाही करीता बोलविले नव्हते. त्यांना सूचनापत्र मिळाले नव्हते. त्यांच्यासमक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नव्हते. बोरगाव बसस्टॉप जवळ पोलीसांनी त्यांच्या सहया घेतल्या होत्या. सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा आणि जप्ती पंचनामा वरील त्यांच्या सहया त्यांनी ओळखलेल्या आहेत. परंतु त्यातील मजकुराबाबत त्यांनी अज्ञान दर्शविले. सदर साक्षीदार सरकारपक्षास सहाय्य करीत नसल्याने भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ नुसार

सरकारपक्षाने सदर साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारले परंतु सरकारपक्षास उपयोगी ठरेल असे कोणतेही कथन सदर साक्षीदाराने केलेले नाही. याशिवाय बचावपक्षाने सदर साक्षीदाराचा उलटतपास नाकारलेला आहे.

९. सरकारपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेले फिर्यादी रविंद्र आंबुडारे (सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे कथन केले आहे की, घटना दिनांक २४.०५.२०२५ रोजी घडली होती. त्यावेळी पोलीस ठाणे अड्याळ येथे पोलीस हवालदार या पदावर ते कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस हवालदार मंगेश बाभरे यांच्यासोबत पेट्रोलींगकामी त्यांची ड्युटी लागली होती. त्यांना गुप्त माहीतीदाराद्वारे माहीती मिळाली की, आरोपी भिमराव उके हा बोरगाव येथे त्याच्या राहत्या घरी अवैधरित्या दारू विक्री करीत आहे. त्यानंतर ते दोन पंचासह आरोपीच्या घरी गेले. पंचांना सुचनापत्र त्यांनी दिले होते. त्यानंतर त्यांनी आरोपीला त्यांची आणि पंचांची ओळख सांगीतली तसेच येण्याचे कारण सांगुण त्याला त्यांची अंगझडती घेण्यास सांगीतले असता त्याने अंगझडती घेण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी पंचांसमक्ष आरोपीच्या घराची झडती घेतला असता त्याच्या घरातून एक पांढऱ्या रंगाची विना झाकणाची डबकी मिळाली. त्या डबकीत ०४ लिटर हातभट्टी दारू होती. त्याचा वास त्यांनी पंचांना दिला. डबकीतील काही दारू एका १८० मी.ली. क्षमतेच्या काचेच्या बाटलीत वेगळी काढण्यात आली आणि उर्वरीत दारू नाश करण्यात आली. घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा त्यांनी तयार केले होते. त्यानंतर पोलीस ठाण्यात जाऊन त्यांनी तक्रार दिली. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथन केले आहे की, आरोपीच्या घराचे कागदपत्रे त्यांनी जप्त केले नाही. दारू नाशवंत नाही. दारू नाश केल्याचा पंचनामा त्यांनी केला नव्हता. बचावपक्षाच्या ईतर सूचना त्यांनी नाकारलेल्या आहेत.

१०. सरकारपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेले तपासी अधिकारी मंगेश बाभरे (सा.क्र.३) यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक

२४/०५/२०२५ रोजी त्यांच्याकडे अपराध क्र.१३५/२०२५, कलम ६५ (ई) म.दा.का. या गुन्ह्याचा तपास सोपविण्यात आला होता. पोलीस डायरीसोबत त्यांच्याकडे जप्ती पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, आरोपीला सुचनापत्रावर सोडल्याचे नोंद आणि ईतर कागदपत्रे सोपविण्यात आले होते. तपासादरम्यान त्यांनी साक्षदारांचे बयान नोंदविले आणि जप्त मुद्देमालाचा सी.ए. रिपोर्ट प्राप्त केला. आरोपीविरूध्द पुरवा मिळून आल्याने तपासाअंती त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथन केले आहे की, तपासादरम्यान ते घटनास्थळी गेले नव्हते. आरोपीच्या घरासंबंधीचे कागदपत्रे त्यांनी प्राप्त केले नव्हते. बचावपक्षाच्या ईतर सूचना त्यांनी नाकारलेल्या आहेत.

**११.** पटलावरील पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पंच साक्षीदार सोमलाल मंडीये याने सरकारपक्षाच्या हकीकतीस कोणताही सहकार्य केलेला नाही. फिर्यादीच्या कथनानुसार घटनेच्या दिवशी त्यांनी दोन पंचांसमक्ष आरोपीच्या घराची झडती घेतली असता त्यांना घटनास्थळी ०४ लिटर मोहाफुलाची हा.भ. दारु मिळुन आली. परंतु त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन करून मान्य केले आहे की, आरोपीच्या घरासंबंधीचे कागदपत्रे त्यांनी जप्त केले नव्हते. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी मंगेश बाभरे यांच्या कथनानुसार सदर गुन्हयाचा तपासादरम्यान त्यांनी देखील आरोपीच्या घरासंबंधीचे कागदपत्रे प्राप्त केले नव्हते. अशा परिस्थितीत जप्त दारु ही आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आली किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. याशिवाय फिर्यादीच्या कथनास दुजोरा मिळणेकामी घटनेच्यावेळी फिर्यादी सोबत हजर असलेले दुसरे पंच अविनाश शेंडे यांची साक्ष महत्वाची ठरली असती परंतु त्यास साक्षपुराव्याकामी हजर करुन घेण्यात संबंधिताना यश आले नाही. सबब फिर्यादी आणि पंच साक्षीदाराचा अपुरा पुरावा आरोपीच्या ताब्यातुन दारु जप्त केल्याची बाब सिध्द करण्यास पुरेसा ठरत नाही.

**१२.** प्रस्तुत प्रकरणात सी. ए. रिपोर्ट दाखल केलेला आहे. परंतु सी. ए. रिपोर्टवर पूर्णत: अवलंबून राहण्यासाठी, नमूना, त्याची साठवणूक आणि प्रयोगशाळेत सुपूर्द होईपर्यंत त्याची संपूर्ण साखळी ठोस पुराव्यांद्वारे स्थापीत करणे आवश्यक आहे. नमूना कसा आणि कोणत्या पध्दतीने साठवला गेला आणि तो कुठे साठवला गेला, तो वेगळा साठवला गेला होता की ईतर नमूण्यांमध्ये मिसळला गेला होता याचा कोणताही पुरावा नाही. मालखाणा प्रभारी/मुद्देमाल मोहरर हे याबाबत साक्ष देण्यासाठी योग्य व्यक्ती होते परंतु त्यांना सरकारपक्षातर्फे पुराव्याकामी बोलावण्यात आले नाही. घटनास्थळ हे कोणाच्या मालकीचे होते, याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. प्रकरण हे संक्षीप्त स्वरुपाचे आहे. अशा परिस्थीतीत आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेल्या गुन्हयाचे तात्वीक अंग सरकारपक्ष पुराव्याअभावी सिध्द करु शकले नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता –</u>**

**१३.** मुद्दा क्रमांक १ करीता नोंदविण्यात आलेल्या नकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने, आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे सिध्द न झाल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपीची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** जप्ती पत्रकामधील नमूद मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यासाठी पोलीस स्टेशन अडयाळ यांच्याकडे पाठविण्यात यावा.

**४.** आरोपीने बंधपत्राऐवजी दिलेली अनामत रोख रक्कम अपील कालावधी संपल्यानंतर आरोपीला परत देण्यात यावी.

**५.** आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ४८१ प्रमाणे ५,०००/– रुपयांचा वैयक्तीक बंधपत्र द्यावा.

**६.** न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

स्वा/–
**(व्ही.आर.फरकुंडे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,**
**पवनी.**

**दिनांक – २३/०७/२०२६.**
**ठिकाण – पवनी.**

**भाग - क**

**साक्षीदारांचा तपशील**
**सरकार पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | सोमलाल अरुण मंडीये | पंच |
| स.सा.क्र.२ | रविंद्र सुर्यभानजी आंबुडारे | फिर्यादी |
| स.सा.क्र.३ | मंगेश शिवचरण बाभरे | तपासी अधिकारी |

**आरोपी पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

सं. फौ.ख.क्र.५००/२०२५
सरकार –वि– भिमराव

## न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी.

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

## सरकार पक्षातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.०८ | पंचांना दिलेले सुचनापत्र |
| २ | नि.क्र.०९ | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | नि.क्र.१० | जप्ती पंचनामा |
| ४ | नि.क्र.११ | तक्रार |
| ५ | नि.क्र.१२ | छापील प्रथम खबर अहवाल |

## आरोपीतर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

## न्यायालयातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी.

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | ... |

## महत्वाच्या वस्तु/(मटेरिअल ऑब्जेक्ट).

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | ... | अंतिम अहवाल रकाना क्र.१० अन्वये वर्णन असलेले मुद्देमाल. |

स्वा/–
**(व्ही.आर.फरकुंडे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,**
**पवनी.**

**दिनांक – २३/०७/२०२६**
**ठिकाण – पवनी.**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Judicial Magistrate F. C. (Court No.2) Pauni. |
| Name of the Steno | : | Rohini Kumbhalkar, Steno (Grade-3). |
| Judgment date | : | 23/07/2026 |
| Judgment signed by P.O. on | : | 23/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 23/07/2026 |

*****